**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४०/२०२२**
**निलिमा +०२ वि कोणीही नाही.**
CNR No. - MHRG090007182022

# निशाणी ०१ खालील आदेश

प्रस्तूतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन VIII १८२७ चे क्लॉज २ प्रमाणे उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला.

०२. अर्जदारांचे कथनानुसार अर्जदार क्र.०१ चे पती व अर्जदार क्र.०२ व ०३ यांचे वडील **नंदकुमार भिवाजी आंब्रे** हे **दि.१७.०५.२०२२** रोजी मयत झाले. सदरील मयताचे नावे एच ई डिलक्स मोटार सायकल नोंदणी क्र. एम एच–०६/बी एक्स–५६१८ मॉडल नं. एच ई डिलक्स काळा रंग असून उपरोक्त वाहनावर कायदेशीर वारस अर्जदार यांची नावे लावणे करीता व इतर शासकीय कामाकरीता त्यांनी संबंधीत अधिकाऱ्यांशी संपर्क केला असता त्यांनी अर्जदारांना न्यायालयाचे उत्तराधिकार प्रमाणपत्र दाखल करण्याची तोंडी सुचना केली. परिणामी अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला.

०३. अर्ज दाखल झाल्यानंतर मयताचे मौजे आंबेवाडी, कोलाड येथील राहते मिळकतीचे ठिकाणी, सार्वजनीक ठिकाणी, ग्रामपंचायतीचे नोटीस बोर्डवर व दिवाणी न्यायालय रोहा यांचे नोटीस बोर्डवर जाहिरनामा (नि.क्र.०७) प्रसिद्ध करण्यात आला. त्याचप्रमाणे ''दैनिक सागर'' या वृत्तपत्रामध्ये दि.२१.१२.२०२२ रोजी हरकती मागविणारी जाहिरनामा नोटीस (नि.क्र.१३) प्रसिद्ध करण्यात आली. परंतू कोणीही

विहित कालावधीत हजर राहून आपली हरकत नोंदविलेली नाही.

०४. अर्जदारांतर्फे अर्जदार क्र.०१ हिचे सरतपासाचे शपथपत्र (नि.क्र.११) अन्वये अभिलेखावर दाखल करण्यात आले. सदरच्या प्रतिज्ञापत्रात अर्जदार क्र.०१ हिने अर्जातील मजकूराची शपथेवर पुर्नरावृत्ती केली. अर्जदारांनी अभिलेखावर मयत नंदकुमार भिवाजी आंब्रे यांचे मृत्यू प्रमाणपत्राची पडताळलेली प्रत (नि.क्र.१२), 'दैनिक सागर'' या वृत्तपत्रामध्ये दि.२१.१२.२०२२ रोजी दिलेली जाहिर नोटीस (नि.क्र.१३), अर्जदाराच्या रेशनकार्डची पडताळलेली प्रत, अर्जदार क्र.०१ चे आधारकार्ड व पॅनकार्ड या दस्तांच्या पडताळलेल्या प्रती व मोटार सायकल नोंदणी क्रमांक एमएच–०६/बी एक्स–५६१८ च्या आर.सी.बुकची नक्कल प्रत, हा लेखी पुरावा दाखल केला. अर्जदारांनी पुरसीस दि.१७.०७.२०२३ अन्वये त्यांचा पुरावा बंद केला.

०५. अर्जदारांनी अभिलेखावर दाखल केलेल्या तोंडी व लेखी पुराव्याचे काळजीपुर्वक वाचन केले असता **नंदकुमार भिवाजी आंब्रे** यांचा मृत्यू **दि.१७.०५.२०२२** रोजी झाल्याचे दिसून येते. अर्जदार क्र.०१ ही सदर मयताची पत्नी, अर्जदार क्र.०२ हा त्यांचा मुलगा व ०३ ही त्यांची मुलगी असून ते सदर मयताचे वर्ग ०१ मधील कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार क्र.०१ हिचे शपथपत्र अर्जदार यांचे व्यतिरीक्त सदर मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार असल्याचे दर्शवित नाही. अर्जदार यांना मयताचे मृत्यू पश्चात त्यांच्या मालकीच्या वर नमूद वाहनावर त्यांची नावे वारस म्हणुन लावण्याकरीता व इतर शासकीय कामाकरीता उत्तराधिकार प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदर

प्रमाणपत्र त्यांचे नावे निर्गमित करण्यास कोणतीही हरकत अथवा अडथळा दिसून येत नाही. अर्जदार क्र.०१ हिने शपथेवर दिलेल्या पुराव्यावर अविश्वास दाखविण्याचे कुठलेही कारण दिसून येत नाही. त्याचप्रमाणे प्रस्तुत प्रकरणामध्ये जाहिरनामा (नि.क्र.०७) व जाहिर नोटीस (नि.क्र.१३) प्रसिद्ध करून देखील कोणीही हरकत न घेतल्याने आणि अर्जदारांनी तोंडी व लेखी पुराव्याचे आधारे अर्जातील कथने प्रस्थापीत केल्याने प्रस्तुत अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. अर्जदार क्र.०१ श्रीमती निलिमा नंदकुमार आंब्रे, अर्जदार क्र.०२ नितीन नंदकुमार आंब्रे व अर्जदार क्र.०३ सौ. अपर्णा प्रमोद म्हामुणकर यांचे नावे उत्तराधिकार प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावे.

०३. प्रस्तुत उत्तराधिकार प्रमाणपत्र अर्जदार यांना मयत **नंदकुमार भिवाजी आंब्रे** यांचे मृत्यूपश्चात काळ्या रंगाची मॉडल क्र.एच ई डिलक्स मोटार सायकल नोंदणी क्र. एम एच–०६/बी एक्स–५६१८ यावर व इतर शासकीय कामाकरीता अर्जदार यांची नावे चढविण्याकरीता महाराष्ट्र कोर्ट फी अधिनियम, १९५९ शेड्युल–१, आर्टीकल १२ अन्वये आवश्यक कोर्ट फी दिल्यानंतर निर्गमित करण्यात यावे. अर्जदार यांना सदरील उत्तराधिकार प्रमाणपत्र इतर कोणत्याही चल अथवा अचल मिळकतीकरीता वापरावयाचे झाल्यास न्यायालयास त्याबबात कळवून

**(नि.०१ वरील आदेश)**

आवश्यक तो न्यायालयीन मुद्रांक जमा करणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

०४. अर्जदार यांचे नावे उत्तराधिकार प्रमाणपत्र निर्गमित करतेवेळी त्यावर उपरोक्त शर्त क्र.०३ चा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा.

०५. उत्तराधिकार प्रमाणपत्राचे शेवटी दिवाणी मॅन्युअल प्रकरण क्र.१४ परि.क्र.३१२ मधील नोट टाकावी.

sunil sakharam mahale

Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2023.07.21 18:22:43 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)

दिनांक – २१.०७.२०२३. दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, रोहा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order are same word to word as per the original Judgment or Order.

| | |
|---|---|
| Name of the stenographer | :- S. G. Padwal, Grade -III. |
| Name of the Court | :- C.J.J.D. & J.M.F.C. Roha, |
| Judgment / Order dictated on | :- 21/07/2023. |
| Judgment / Order delivered on | :- 21/07/2023. |
| Judgment / Order signed on | :- 21/07/2023. |
| Judgment / Order uploaded on | :- 21/07/2023. |